बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०३ एप्रिल २०२५**

## जिल्हा नियोजन व विकास निधी २०२४-२५ मधुन प्राप्त ११ वाहनांचा लोकार्पण सोहळा

आज दि. ०३/०४/२०२५ रोजी पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथे जिल्हा नियोजन व विकास निधी २०२४-२०२५ वार्षिक योजनेअंतर्गत मंजुर शासकीय निधीतुन पोलीस दलास देण्यात आलेल्या ११ वाहनांचा लोकार्पण कार्यक्रम सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना. श्री. जयकुमार गोरे, यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाप्रसंगी मा.ना. श्री. जयकुमार गोरे, मंत्री ग्रामविकास व पंचायत राज महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री सोलापूर यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस विभागातील समस्या व अडचणी संदर्भात मार्गदर्शन केले.

सदर लोकार्पण सोहळा समारंभाकरीता मा. श्री. जयकुमार गोरे, मंत्री ग्रामविकास व पंचायत राज महाराष्ट्र राज्य मुंबई तथा पालकमंत्री सोलापूर यांचे सोबत सोलापूर मध्य मतदार संघाचे आमदार मा.ना. श्री देवेंद्र कोठे हे उपस्थित होते. तसेच सदर लोकार्पण कार्यक्रमाकरीता पोलीस आयुक्त, मा.श्री. एम राज. कुमार, पोलीस उप-आयुक्त मा. श्री. अजित बोऱ्हाडे, पोलीस उप आयुक्त मा. डॉ. दिपाली काळे मॅडम, पोलीस उप आयुक्त मा. श्री. विजय कबाडे, तसेच सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच पत्रकार बंधू उपस्थित होते.




